Impact: 1

Date : 20/09/25

News : Nipaksh vrutsatta


# निपक्ष वृत्तसत्ता

September 20, 2025 | Page no:3
epaper.nipakshwruttsatta.in - 9158517695
Powered By EpaperOnline.In - 9504040304


## सायबर क्राईम व फ्रॉड कॉल विषयी सोनल तोडकर व गौरी पाटील यांस कडून निसर्ग राजा शेतकरी महिला व पुरुष गटास मार्गदर्शन

निपक्ष वृत्तसत्ता न्यूज नेटवर्क




मार्डी -उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी गावात पाणी फाउंडेशन अंतर्गत निसर्ग राजा शेतकरी गट यांच्या माध्यमातून कुमारी सोनल तोडकर व गौरी पाटील या दोन्ही विद्यार्थिनींनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमार्फत सायबर क्राईम व फ्रॉड कॉल विषयी निसर्ग राजा शेतकरी महिला व पुरुष गटास मार्गदर्शन केले.

पण सध्याच्या काळात मोबाईल सर्वांकडे आहे, त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांना वाटले की शेतकरी व शेतामध्ये काम करणाऱ्या घरामध्ये काम करणाऱ्या महिलांना सुद्धा याबद्दल माहिती असावी म्हणून खास करून गावातील शेतकरी गटात यांनी याबद्दल सविस्तर माहिती दिली, याचा गावकऱ्यांना व अशिक्षित शेतकऱ्यांना निश्चित फायदा होईल आणि येणारे फ्रॉड फॉल बँक अकाउंट मध्ये होणारी फसवणूक यातून त्यांना सावध राहता येईल . यावेळी माजी मुख्याध्यापक गवळी सर तसेच, धन्यकुमार मुडके सर ,चंदू नारायणकर ,बापूसाहेब तोडकर, गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते, उमेद अभियान महिला सीआरपी अपर्णाताई देशमुख तसेच ,जलवंता मठे, इतर महिलावर्ग मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.तसेच गटाचे निमंत्रक मनोरंजन जाधव यांनी आभार मानले. तसेच,गटाचे सचिव रामचंद्र ढगे, संतोष तोडकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.यावेळी निसर्ग राजा शेतकरी गटातील सदस्य हनुमंत काटे, दादा कोप्पा, गणेश पाटील, शेखर मुडके ,प्रदीप मुडके ,मदन मुडके, प्रशांत माळी ,कालिदास माळी, नितीन गवळी ,यावेळी कार्यक्रमास उपस्थित होते